# नियमित दिवाणी दावा क्र. ६८७/२०११ मधील आदेश नि.क्र. ५६

वादी तर्फे अर्ज की, मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर आणण्यास झालेला उशीर माफ होवून प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळावी याबाबत विनंती केली आहे.

२. वादीचे (नि.क्र.५६) अर्जातील कथन असे आहे की, दाव्याचे कामकाज सुरु असताना प्रतिवादी नं. ३ संदिप रामलिंग मस्तूद या दिनांक १९/१०/२०२१ रोजी मयत झाले आहेत. वादीने प्रतिवादी नं. ३ चे दावा मिळकतीचे गाव नमुना नं. ६ फेरफार उतारा, गट नं. ९५९/२ व ९९२/३ चे सात बारा उतारे दिनांक १५/०९/२०२३ रोजी काढले. त्यावेळेस प्रतिवादी नं. ३ हे दिनांक १९/१०/२०२१ रोजी मयत झाल्याचे दिनांक १५/०९/२०२३ रोजी कळाले. त्यामुळे विहित मुदतीमध्ये मयत प्रतिवादी क्र. ३ चे वारस अभिलेखावर घेण्यास उशीर झाला आहे. दावा हा कब्जा, दरम्यानचे उत्पन्न व निरंतर ताकिदीसाठी आहे. प्रतिवादी क्र. ३ चे वारस अभिलेखावर घेणे व त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे वारस अभिलेखावर आणण्यास झालेला दोन वर्षे बावीस दिवसांचा विलंब माफ होवून अवसान हुकूम रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादी यांचे म्हणणे मागविण्यात आले. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी आपले म्हणणे देवून अर्जास विरोध केला आहे. सदर अर्ज दाखल करण्यास दोन वर्षाचा विलंब झाला आहे. त्यामुळे सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. प्रतिवादी क्र. ३ यांचे वारसांना सदर अर्जाची नोटीस बजावणी होवून सुद्धा प्रतिवादी क्र. ३ चे वारस दाव्याकामी न हजर झाल्याने त्यांचे विरुद्ध सदर अर्ज एकतर्फा चालविण्यात यावा असा आदेश दिनांक २४/०६/२०२४ रोजी नि.क्र. ५६ वर पारित झाला आहे.

५. अर्ज व म्हणणे वाचले. वादीचे विधीज्ञ गैरहजर. प्रतिवाचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. सदर दावा वादीने प्रतिवादीविरुद्ध दावा कब्जा दरम्यानचे उत्पन्न व निरंतर मनाई करीता दाखल केला आहे. प्रतिवादी नं. ३ संदिप रामलिंग मस्तूद हे दिनांक १९/१२/२०२१ रोजी मयत झाले असल्याचे मयत दाखला नि.क्र. ५५/१ व फेरफार क्र.

७२३३ नि.क्र. ५५/१ अन्वये दिसू येते. सदर प्रतिवादी क्र. ३ हे मयत असल्याची बाब प्रतिवादी तर्फे आव्हानीत केली नाही. प्रतिवादी क्र. ३ यांची मृत्यू दिनांक ध्यानात घेता असे आढळून येते की, सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ३ चे वारस मुदतीमध्ये अभिलेखावर सामील न केल्याने सदर दावा सदर प्रतिवादी विरुद्ध अवसान झाला आहे. तसेच अवसान हुकूम रद्द करण्याकरीता अर्ज दाखल करण्यास देखील विलंब झाला आहे.

६. सदर प्रकरणाचे स्वरुप ध्यानात घेता वादीस सदर दावा प्रतिवादी क्र. ३ चे वारसांविरुद्ध चालविण्याचा अधिकार आहे. तसेच सदर प्रकरणातील अंतिम निर्णय प्रतिवादी क्र. ३ चे वारसांचे हितसंबंधाची निगडीत असणार आहे. त्यामुळे त्यांना दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणामध्ये नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने मयत प्रतिवादी क्र. ३ यांचे यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेतल्यास दावा हा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. अर्जदाराने सदर अर्जामध्ये नमूद केलेली कारणे अर्जदारास झालेला विलंब माफ करण्याकरीता व अवसान हुकूम रद्द करण्याकरीता समाधानकारक व संयुक्तिक आहे. त्यामुळे न्यायाचे हित विचारात घेवून उपरोक्त कारणमिमांसा ध्यानात घेता प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर करणे उचित होईल. त्यामुळे न्यायाचे हित ध्यानात घेवून पुढील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१. प्रस्तुतचा अर्ज नि.क्र. ५६ खर्चासह मंजूर करण्यात आला.

२. प्रतिवादी क्र. ३ यांचे विरुद्ध पारित झालेला अवसान हुकूम रद्द करण्यास अर्ज दाखल करण्याकरीता झालेला विलंब माफ करण्यात आला.

२. प्रतिवादी क्र. ३ यांचे विरुद्ध झालेला अवसान हुकूम रद्द करण्यात येत आहे.

३. वादीने प्रतिवादीस रक्कम रु. ५००/– वाद खर्च द्यावा.

सही/-

(श्रीमती एच.यू.यू. पाटील)

दिनांकः ०३/१०/२०२४

४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Smt. S.V. Kokate (Grade III) |
| (b) | Court | : | Smt. H.U.U. Patil,<br>4th Jt. Civil Judge, J.D.<br>& J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 03/10/2024 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 04/10/2024 |